| महाराष्ट्र शासन<br>सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा आ.से (परिवहन),छत्रपती संभाजीनगर | |
|---|---|
| दूरध्वनी क्र.९८२३५२३७५६ | सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा,आरोग्य सेवा (परिवहन) निझाम बंगला क्रमांक - ४, छावणी, छत्रपती संभाजीगर<br>ई-मेल smdwabad@gmail.com |
| जा.क्र.सेव्यविकाशाछ.सं / ता वि./ बॅटरी कोटेशन/ 852 | / २०२६ दि. 22/०९/२०२६ |

प्रति,

............................

---------------------------------------------

---------------------------------------------

विषयः- विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन) छत्रपती संभाजीनगर येथिल हयुंदाई व्हेन्यु कार करीता १२ व्होल्ट ५० ए एच प्रकारची नविन बॅटरी चे दरपत्रके सादर करणे बाबत.

उपरोक्त विषयान्वे आपणास विनंती करण्यात येते की, छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा परिवहन हे विभागीय कार्यालय स्थित असून विभागाअंतर्गत एकुण ४ जिल्हयाचा समावेश आहे. या कार्यशाळेमध्ये टाटा, महिंद्रा, स्वराज माझदा, फोर्स हयुंदाई इत्यादी बनावटीच्या वाहनाच्या दुरुस्तीचे काम करण्यात येते.

या कार्यालयाकडून मा.उपसंचालक, आरोग्य सेवा परिवहन पुणे यांच्याकडे प्रस्ताव पाठवून विभागीय कार्यशाळा, छत्रपती संभाजीनगर येथे वाहनांच्या टायर,बॅटरी व इतर आवश्यक साहीत्य व सुटेभाग खरेदीचा प्रस्ताव सादर केला जातो. या कार्यशाळेचे हयुंदाई व्हेन्यु कार या वाहन करीता बॅटरीचे विवरण खालीलप्रमाणे आहे. सदर बॅटरीचे सर्व करसमावेशक दरपत्रके खालील निर्देशाप्रमाणे खालील प्रपत्रात यावेत.

| Sr.No. | Name | Quanty | Rate(inclusion all Taxes ) |
|---|---|---|---|
| 1 | New Bttery 12 Volt 50 AH | 01 no | |

इच्छूक पुरवठादारानी वर नमूद लागणरे साहित्य एकत्रित सर्व करसमावेशक दर संस्थेच्या लेटर हेडवर या कार्यालयास सादर करावयाचे आहेत. सदर दर दिनांक २९ सप्टेबर २०२६ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफयावर वाहनांच्या दुरुस्तीकरिता सुटे भागांबाबतचे दरपत्रके असा उल्लख करावा.

**दरपत्रके स्विकारण्याचे व उघडण्याचे वेळापत्रक.**

| अ.क्र | तपसील | कालावधी | |
|---|---|---|---|
| १ | सिलबंद लिफाफा स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ | २९/०९/२०२६ | दुपारी ४.०० वाजेपर्यंत |
| २ | दरपत्रके उघडण्याची वेळ व तारीख | २९/०९/२०२६ | दुपारी ०५ वाजेनंतर |
| | दरपत्रके उघडण्याचे ठिकाण | सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा,आरोग्य सेवा (परिवहन) छत्रपती संभाजीनगर<br>पत्ता- निजाम बंगला नं. ४, छावणी, छत्रपती संभाजीनगर ४३१००२ | |

प्राप्त संस्थांची दर पत्रके २९/०९/२०२६ दुपारी ०५ वाजेनंतर या कार्यालयामध्ये उघडण्यात येतील.

**<u>दरपत्रक सादर करताना घ्यावयाच्या सुचना</u>**

१) दरपत्रकासोबत एकल निविदा असणेबाबत तसेच खरेदी प्राधिकाऱ्यासोबत कोणत्याही प्रकारचा हितसंबधाचा संघर्ष नसल्याबाबत "निविदाकाराची हमी" चे विहित प्रपत्र- अ सोबत जोडण आवश्यक आहे.

२) दर पत्रक सादर करण्याऱ्या संस्थेच्या दर लेटरहेडवर नमूद करण्यात यावा व बसविण्यात येणाऱ्या सर्व साहित्याची एक महिण्याची वॉरंटी बाबतची हमी पुरवठा दारानी लेखी स्वरुपात दयावी.

३) अटी व शर्तीसह असलेले दरपत्रक स्विकारण्यात येनार नाही.

४) दरपत्रकामध्ये खाडाखोड (Over writing) केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

५) विहित मुदतीत सादर न कलेले दर पत्रके स्विकारण्याात येणार नाही.

६) दरपत्रकांमध्ये नमूद दर / किंमत सर्व करसहीत असावे.

७) अनुदानाच्या उपलब्धेतेनुसार साहित्याच्या नग संख्येत बदल होतील.

८) दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा पुर्ण अधिकार सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आराग्य सेवा (परिवहन) छत्रपती संभाजीनगर यांना राहतील. कोणतेही लेखी कारण न देता दरपत्रके नाकारण्याचा पुर्ण अधिकार सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन) छत्रपती संभाजीनगर यांना राहतील.

सेवा व्यवस्थापक
विभागीय कार्यशाळा,आरोग्य सेवा
( परिवहन) छत्रपती संभाजीनगर

प्रत :- नोटीस बोर्ड.

## निविदाकारांनी द्यावयाच्या हमीपत्राचा नमूना

मी / आम्ही / आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही तसेच मी / आम्ही / आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.

दिनांक :-

सही